# ऋ णा नि र्दे श


शिवाजी विद्यापीठाच्या एम्.फिल्. पदवीसाठी "'बिढार' मधील सामाजिकतेचे चित्रण" हा शोधप्रबंध तयार करीत असताना गेल्या दोन वर्षात मला अनेक व्यक्तींचे मोलाचे मार्गदर्शन व प्रेमळ सहाय्य लाभले. त्यामुळेच हा शोधप्रबंध पूर्णत्वास गेला आहे. त्या सर्वांचा ऋणनिर्देश करणे मला अगत्याचे वाटते.

या शोधप्रबंधासाठी माझे सन्माननीय मार्गदर्शक डॉ. गो.मा. पवार यांच्याकडून मला वेळोवेळी आत्मीयतेने व समर्थ असे मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या या मार्गदर्शनामुळेच या शोधनिबंधाला मूर्तरुप आले आहे. त्यांचे ऋण अभिमानाने मिरवावे असेच आहे. तसेच शिवाजी विद्यापीठातील मराठी विभागाचे डॉ.ल.रा. नसिराबादकर, प्रा. रमेश ढावरे आणि प्रा. प्रभाकर पाटील या सर्वांची मी ऋणी आहे.

बॅ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालय, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर राजाराम महाविद्यालय, कोल्हापूर, महात्मा गांधी वाचनालय, कोल्हापूर, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, दादर, जयकर ग्रंथालय, पुणे विद्यापीठ, पुणे या ग्रंथालयांचे मोलाचे साहाय्य मला लाभले. या ग्रंथालयातील अधिकारी वर्ग व सेवकवर्ग यांची मी ऋणी आहे.

"बिढार" कादंबरीचे लेखक ख्यातनाम समीक्षक प्रा.डॉ. भालचंद्र नेमाडे यांच्याशी चर्चा केली त्यावेळेस त्यांनी आवश्यक सूचना देऊन मला मार्गदर्शन केले त्यांची मी ऋणी आहे.

प्रा.विजयकुमार मगदूम, प्रा.ता.रा. भोसले, प्रा. वेदपाठक, प्रा. विष्णू वासमकर, प्रा. शानेदिवाण, सौ. सुप्रिया जोशी, सौ.रोहिणी तुकदेव, कु.विजया वाडकर, कु. उषा जैन यांनी मला आवश्यक ते संदर्भग्रंथ व प्रोत्साहन देऊन कायमचे ऋणात ठेवले आहे.

डी. आर. माने महाविद्यालयाचे सेक्रेटरी, प्राचार्य व इतर प्राध्यापक वर्ग यांनी शोधनिबंधाची आस्थेने चौकशी केली व प्रोत्साहन दिले. त्यांचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख करणे मी माझे कतव्य समजते.

या प्रबंधाच्या पूर्ततेपर्यंत माझ्या आई-वडीलांनी कायम प्रोत्साहन दिले व मदतीचा हात पुढे केला. त्यांचे हे अमूल्य ऋण मी तसेच ठेवू इच्छिते.

श्री. विष्णुपंत खाडे यांनी अल्पावधीत टंकमुद्रण करून दिले त्याबद्दल त्यांचे व भावेश्वरी मुद्रणालयाचे संचालक व सेवकवर्ग यांनी प्रबंधाची सुबक बांधणी करून दिल्याबद्दल त्यांचेही मी आभार मानते.

-- कु. नीला दत्तात्रय पानवलकर

.....